*नियमित दिवाणी दावा क्र.०२/२०१७.*
*पुष्मा जाधव वि. सिताराम वाणी वगैरे.*
CNR NO.MHRG16000122017.

**निशाणी क्र.३९ वरील आदेश**
(दिनांक ०९ मार्च, २०२३ रोजी पारीत.)

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा दुरुस्ती करीता दाखल केलेला आहे. प्रतिवादीने अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे.

०२. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. ०१ ने वादीची फसवणूक करुन दि. ११/०८/२०२१ रोजी स्वतःचे नावे केलेले दस्त क्र. २४७३/२०११ अन्वये नोंदवलेले विना मोबदला हक्कसोडपत्र बेकायदेशीर आहे, तसेच दावा मिळकतीची प्रतिवादी क्र. ०१ ने कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावू नये आणि ति–हाईत इसमांचे हक्क हितसंबंध निर्माण करु नये अशा निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. तसेच दरम्यानच्या काळात कोरोना महामारीचा प्रादूर्भाव असल्यामुळे व वादी परगावी राहत असल्यामुळे त्यांना न्यायालयात हजर राहता आले नाही. याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. ०१ याने दावा मिळकतीपैकी ००. हे.७५.५ आर. क्षेत्राचे खरेदीखत दि. १५/१२/२०२० रोजी दस्त क्र. १३१०/२०२० अन्वये प्रशांत पाटील यांना विक्री केल्याचे वादी यांना समजले. म्हणून वादीने दावा मिळकतीचा सात–बारा उतारा काढला, त्यानुसार प्रशांत पाटील यांनी सदर मिळकत पुन्हा जितेश्री समीर चौगुले यांना दि. २८/०१/२०२२ रोजी दस्त क्र. १८७/ २०२२ अन्वये विक्री केल्याचे समजले. सदर खरेदीखतामुळे वादीचे कायदेशीर हक्कास बाधा होत असल्याने प्रस्तुत दाव्यात खरेदीदार क्र. ४ व ५ यांना सामील करुन घ्यावेत. अशा दुरुस्तीची परवानगी मागितलेली आहे.

०३. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्ज मोघम आहे.

०४. अभिलेखाची पाहणी केली. वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दाखल असलेल्या अर्ज व म्हणणे यांचे अवलोकन केले.

०५. वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित झाले असून त्याची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | वादी त्यांचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजुर होवून मिळणेस पात्र आहेत काय ? | होकारार्थी. |
| ०२. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>मुद्दा क्र.०१ व ०२ करीताः</u>–**

०६. वादी यांनी प्रस्तुतचा दावा ठरावाकरीता व ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. रोजनाम्याची पाहणी केली असता सदरहु दावा मुद्दे काढण्याकरीता प्रलंबित असुन वादी यांनी प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज दि.०३.१२.२०२२ रोजी दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ याने दावा मिळकतीपैकी ०० हे. ७५.५ आर. क्षेत्राचे खरेदीखत दस्त क्र. १३१०/२०२० अन्वये प्रशांत पाटील यांना विक्री केले. तसेच सदर मिळकत पुन्हा जितेश्री समीर चौगुले यांना विक्री केली. त्यामुळे वादींनी त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करण्याचे गरजेचे आहे असे कथन आहे. वादी मागणी करत असलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये अथवा प्रतिवादींच्या बचावामध्ये कोणताही फरक पडणार नाही. वादी मागणी करत असलेल्या दुरुस्तीमुळे दोन्ही पक्षकारातील वाद गुण दोषावर न्यायनिर्णय होणेस मदत होणार आहे. सबब, न्यायाचे दृष्टीने अर्ज मंजुर करणे आवश्यक ठरते असे मला वाटते म्हणुन मी मुद्दा क्र.०१ चे उत्तर होकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र.०१ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**:: आ दे श ::**

०१. वादी यांचा अर्ज नि.क्र.३९ मंजूर करण्यात येतो.

०२. वादी यांनी मागणी केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन, तशी दुरुस्ती दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत अथवा त्यापूर्वी सादर करावी.

MEENA WAMAN JADHAV

Digitally signed by MEENA WAMAN JADHAV
Date: 2023.03.21 16:52:00 +0530

**पाली.** **(मीना वामन जाधव)**

**दिनांकः ०९.०३.२०२३.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पाली.**